पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/०९/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१८/०९/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
४. मा.भारती फरांदे
५. मा.पाडाळे निता विलास
६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.कुलकर्णी, मा.घोडे – कार्यकारी अभियंता, मा.गायकवाड – उद्यान अधिक्षक (वृक्ष) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.५) प्र.क्र.३२ सॅन्डविक कॉलनी, सावंतनगर शेजारील नाल्यावर आवश्यकतेनुसार सी.डी. वर्क्स बांधणे.

----------

**अ**) दिनांक २१/०७/२०१५, ३०/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २१) सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**आ**) दिनांक ३०/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२) सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक १४/०९/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : ४ विषय क्रमांक : १

दिनांक : १८/०९/२०१५ विभाग – प्रशासन

सुचक : मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/६९४/२०१५, दि.०७/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर " कार्यकारी अभियंता (विद्युत)" अभिनामाची ८ पदे पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर सद्यस्थितीत रिक्त असलेले १ पद पदोन्नतीने भरणेकरीता दि.१७/०६/२०१५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने " कार्यकारी अभियंता (विद्युत)" पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक " उप अभियंता (विद्युत)" पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इ. सेवाविषयक तपशील पडताळून श्री.मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून " कार्यकारी अभियंता (विद्युत)" या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये कनिष्ठ अभियंता (विद्युत) पदाचे पदविकाधारक व पदवीधारक अशा स्वतंत्रपणे सेवाजेष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत व त्यानुसार उपअभियंता (विद्युत) पदावर पदोन्नती देण्याबाबत मे.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असलेली याचिका क्र.२१४५/२००५ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे. सबब मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून " कार्यकारी अभियंता (विद्युत)" या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५ विषय क्रमांक : २

दिनांक : १८/०९/२०१५ विभाग – उद्यान

सुचक : मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक : मा.आर.एस.कुमार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४अ/कावि/५२१/२०१५, दि.११/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे जोग महाराज उद्यानातील लॉनचे नुतनीकरण करणे कामीचे रक्कम रु.१७,७६,६५०/- (अक्षरी र.रु.सतरा लाख शहात्तर हजार सहाशे पन्नास फक्त) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६ विषय क्रमांक : ३

दिनांक : १८/०९/२०१५ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.आर.एस.कुमार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/२/कावि/३०८/२०१५, दि.१२/०८/२०१५

आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष यांनी त्यांचे दि.१३/०७/२०१५ रोजीचे मा.महापौर व मा.आयुक्त यांना दिलेल्या निवेदनानुसार मा.हरीत लवादाने आळंदी नगरपरिषदेस प्रक्रिया प्रकल्प उभारेपर्यंत कच-याची पर्यायी व्यवस्था करणेचे आदेश दिल्याने तसेच आळंदी ही तिर्थक्षेत्र असून लाखो भाविक शहरात येत असतात तसेच लग्नसराईत येणा-या भाविकांचा विचार करता कचरा प्रक्रियेची सुविधा तयार होईपर्यंत मोशी कचरा डेपो येथे कचरा टाकण्यास परवानगी मागितलेली आहे. यापूर्वी आळंदी नगरपरिषदेने दि.२८/०३/२००८ व दि.१०/०५/२०१३ रोजीचे पत्रान्वये मनपाचे मोशी कचरा डेपो येथे कचरा टाकणेस परवानगी मागितली होती. त्यानुसार प्रथमत: आळंदी नगरपरिषदेस दि.३०/०६/२००८ अखेर पर्यंत एकूण ८४१.६१० मे.टन कचरा प्रती किलो ५० पैसे या प्रमाणे काही अटी व शर्तीनुसार मोशी कचरा डेपोमध्ये टाकणेत आला होता. तसेच दि.०६/०६/२०१२ ते १२/०६/२०१२ या कालावधीमध्ये प्रतीदिनी सुमारे ८ मे.टन इतका कचरा र.रु.२५६/- प्रति टन या प्रमाणे आकारणी करुन काही अटी व शर्तीवर परवानगी देणेत आली होती. याकामी त्याचे मार्फत एकूण ८० मे.टन कच-यासाठी र.रु.२०,४८०/- इतके शुल्क मनपा कोषागारामध्ये जमा करणेत आले होते, परंतु प्रत्यक्षामध्ये आळंदी नगरपरिषदेमार्फत दि.०६/०६/२०१२ व दि.०८/०६/२०१२ या कालावधीमध्ये एकूण६.९५ मे.टन इतका कचारा मोशी कचरा डेपोमध्ये टाकणेत आला होता. उपरोक्त बाबींचे अवलोकन करता आळंदी नगरपरिषदेची सद्यस्थितीमधील लोकसंख्या व तरंगती लोकसंख्येनुसार कच-याचे प्रमाणामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. मनपाचे परिसरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या कच-याचे प्रमाणात देखील मोठया प्रमाणात वाढ होत आहे. मनपाच्या कचरा डेपोमधील बहुतांश जागा वापरणेत आली असून उर्वरित जागा जास्तीत जास्त पुढील ३ ते ४ वर्ष कालावधीसाठी वापरणे शक्य होईल. मनपाच्या मोशी कचरा डेपो येथील उपलब्ध जागेचा विचार करता त्याचप्रमाणे शहराबाहेरील कचरा मोशी

कचरा डेपोमध्ये टाकण्यास स्थानिक लोकप्रतिनिधींचा विरोध होण्याची शक्यता असल्याने आळंदी नगरपरिषदेस कचरा टाकणेस परवानगी देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असून यास मनपा सभेची मान्यता घेणे योग्य होईल. आळंदी नगरपरिषदेचा निर्माण होणारा कचरा त्यांचे कडील प्रक्रीया प्रकल्प पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी मोशी कचरा डेपोमध्ये सशुल्क व आवश्यक त्या अटी शर्तीवर टाकणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकामीचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक : ७ विषय क्रमांक : ४

दिनांक : १८/०९/२०१५ विभाग – विद्युत ई क्षेत्रीय

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/इक्षेका/३६४/२०१५, दि.१७/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी स्मशानभुमीमधील विद्युत दाहिनीचे ठेका पध्दतीने चालन, देखभाल व दुरुस्तीचे काम करणे या कामाच्या र.रु.३३,४८,३३५/- ( अक्षरी र.रु.तेहतीस लाख अठ्ठेचाळीस हजार तीनशे पस्तीस फक्त ) इतक्या सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : ८ विषय क्रमांक : ५

दिनांक : १८/०९/२०१५ विभाग – स्थापत्य ई क्षेत्रीय

सुचक : मा.नीता पाडाळे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इस्था/कावि/१०/८७२अ/२०१५, दि.२९/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्रमांक ३२ सॅन्डविक कॉलनी, सावंतनगर शेजारील नाल्यावर आवश्यकतेनुसार सी.डी.वर्क्स बांधणेकामी येणा-या र.रु.५०,००,०००/- ( अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे सुधारीत पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( नंदा विकास ताकवणे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६६९/२०१५
दिनांक : १९/०९/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-14-15\proceeding 2_Vidhi.doc